Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
ANANDI B. PHARMACY COLLEGE,
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email: anandipharmacycollege02@gmail.com

| Criteria :5 | Student Support and Progression |
|---|---|
| **Key Indicator: 5.1** | Student Support |
| **Metric Point: 5.1.1** | Percentage of students benefited by scholarships and free-ships provided by the institution, government and non-government bodies, industries, individuals, philanthropists during the last five years |

**Policy document of the HEI for award of scholarship and free ships**

**Data verified by:**

| | |
|---|---|
| **IQAC Coordinator** | Anandi Pharmacy College, Kalambe Tarf Kale, Tal. Karveer, Dist. Kolhapur |
| **Principal**<br>Principal<br>Anandi Pharmacy College<br>Kalambe Tarf Kale,<br>Tal. Karveer, Dist. Kolhapur. | |

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email: anandipharmacycollege02@gmail.com

**5.1.1. Upload policy document of the HEI for award of scholarship and free-ships.**

The policy documents are GR of the State Government availing various scholarships including; SC/ ST/ NT/ VJ-DT/OBC and scholarship for economically backward candidates.

Kalambe Tarf Kale ✶ Anandi Pharmacy College
Tal. Karveer, Dist. Kolhapur.

Principal
Anandi Pharmacy College
Kalambe Tarf Kale,
Tal. Karveer, Dist. Kolhapur.

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email: anandipharmacycollege02@gmail.com

सन २०१८-१९ पासून महाडिबीटी प्रणालीवर राबविण्यात येणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता केंद्र व राज्य पुरस्कृत शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क इ. योजनांच्या अंमलबजावणी संदर्भात मार्गदर्शक सुचना.

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन परिपत्रक क्र. इबीसी-२०१८/प्र.क्र. ४८४ /शिक्षण-१**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२
दिनांक :- ०८ जानेवारी, २०१९

**वाचा :-** १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग (माहि) क्रमांक मातंस-२०१८/प्र.क्र. १३८/एस-१/३९, दि.१२.१०.२०१८
२) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण,मुंबई यांचे पत्र क्र.शुनिप्रा/डिबीटी/१४९८/२०१८, दिनांक १२.११.२०१८

**परिपत्रक :-**

राज्यातील लाभ, आर्थिक सहाय्य आणि सेवा यांचे वितरण करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने थेट लाभ हस्तांतरण (महाडिबीटी) प्रणाली विकसित केली असून, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून पहिल्या टप्प्यात एकूण सहा विभागाच्या अधिनस्थ असलेल्या केंद्र व राज्य पुरस्कृत मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क-परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती इ. ३९ योजनांची अंमलबजावणी महाडिबीटी प्रणालीमधून करण्यास व त्याबाबतची कार्यपध्दती माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने दिनांक १२.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेली आहे.

माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने सदरहू शासन निर्णयान्वये अर्जदाराने महाडिबीटी प्रणालीवर अर्जाची नोंदणी करण्यापासून ते पात्र लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये देय लाभ अदा करण्यापर्यंतची कार्यपध्दती विहीत केलेली आहे. त्यामध्ये क्षेत्रीय अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चितपणे विहीत केलेली नसल्याने ती विहीत करण्याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्थ क्षेत्रीय अधिकाऱ्याकडुन विचारणा होत असल्याने, त्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना, व्यावसायिक पाठ्यक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन योजना आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना या योजनांतर्गत महाडिबीटी प्रणालीवर विद्यार्थ्यांनी नोंद केलेल्या अर्जाबाबत सर्व संबंधित सक्षम प्राधिकारी यांची जबाबदारी पुढील प्रमाणे राहील:-

Kalambe Tarf Kale ★ Anandi Pharmacy College
Tal. Karveer, Dist. Kolhapur.

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email: anandipharmacycollege02@gmail.com



(१) महाडिबीटी प्रणालीवर महाविद्यालय/अभ्यासक्रमाचे मॅपिंग करण्याची, महाविद्यालयनिहाय मंजूर अभ्यासक्रम व त्याची मंजूर प्रवेशक्षमता अपलोड करण्याची व ती वेळोवेळी अद्ययावत करण्याची तसेच त्याबाबत ऑनलाईन तपासणी करण्याची जबाबदारी ही संबंधित प्रशासकीय विभागाची राहणार आहे. तसेच भविष्यात पोर्टलवर नोंद झालेले महाविद्यालय प्रत्यक्षात बंद झाल्यास/ अभ्यासक्रम बंद झाल्यास/महाविद्यालयाची मान्यता काढून घेण्यात आल्यास त्यानुषंगाने पोर्टलवर आवश्यक ते बदल/दुरुस्ती करण्याची जबाबदारी ही देखील संबंधित प्रशासकीय विभागाचीच आहे. त्यामुळे सर्व संबधित सहायक आयुक्तांनी महाडिबीटी पोर्टलवर अनुसुचित जाती प्रवर्गातील अर्ज मंजूर करताना संबंधित महाविद्यालयाच्या अधिनस्थ प्रणालीवरील मंजूर अभ्यासक्रम व मंजूर प्रवेश क्षमता विचारात घ्यावी. त्यामध्ये काही संभ्रम निर्माण झाल्यास सदर बाब आयुक्तालयामार्फत संबंधित प्रशासकीय विभागाच्या निदर्शनास आणावी. तसेच योजनेच्या निकषानुसार मंजूर अभ्यासक्रम महाडिबीटी प्रणालीअंतर्गत समाविष्ट झालेला नसल्यास, अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी लाभापासुन वंचित राहू नयेत, म्हणून सदर अभ्यासक्रम तातडीने प्रणालीवर अपलोड करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तामार्फत संबंधित प्रशासकीय विभागाकडे सादर करावा.

(२) अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्याने महाडिबीटी प्रणालीचा वापर करुन ऑनलाईन नोंद केलेला अर्ज व त्यापुष्ठ्यर्थ प्रणालीवर अपलोड केलेली खालील मुळ कागदपत्रे योजनेच्या निकषाच्या आधारे तपासून, खातरजमा व पडताळणी करुन महाडिबीटी प्रणालीवरुन संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडे ऑनलाईन फॉरवर्ड करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालय/महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

(i) विद्यार्थ्यांच्या जातीचे प्रमाणपत्र (फक्त नवीन [Fresh] प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता).
(ii) व्यावसायिक अभ्यासक्रमातील विहित केलेल्या अभ्यासक्रमा करीता -जातवैधता प्रमाणपत्र.
(iii) मागील वर्षी उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा पुरावा / गुणपत्रिका. (ज्या अभ्यासक्रमांना कॅरी ऑन तत्वावर पुढील वर्षात प्रवेश मिळाला आहे, त्यांनी केवळ गुणपत्रिका जोडावी.)
(iv) मागील उत्तीर्ण अभ्यासक्रमाच्या शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला (L.C/T.C)
(v) सत्रातिल विद्यार्थ्यांची ७५% पेक्षा जास्त उपस्थिती असल्याबाबतचे प्रमाणपत्र.
(vi) उत्पन्नाचा दाखला (भा.स.मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी फक्त नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता तसेच नुतनीकरणाच्या विदयार्थ्यांनी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या वर्षातील उत्पन्नाचा दाखला)
(vii) आधारकार्डची प्रत.
(viii) बँकेच्या पासबुकची झेरॉक्स प्रत.
(ix) बँकेकडून आधार संलग्न झाल्याचे स्लिप/पोहच पावती.
(x) आवश्यकता असेल तेथे गॅप प्रमाणपत्र.



Anandi Pharmacy College Kalambe Tarf Kale ★ Tal. Karveer, Dist. Kolhapur.

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email: anandipharmacycollege02@gmail.com



(३) वर नमुद केलेली आवश्यक कागदपत्रे ही विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत करत असताना अपलोड करावयाची आहेत. तसेच सदरील अपलोड केलेली कागदपत्र व त्यातील मजकूर संपुर्णत: सत्य व खरा असल्याची जबाबदारी ही संबंधित विद्यार्थी व त्याच्या पालकांची असेल.

(४)संबंधित महाविद्यालयाने ऑनलाईन फॉरवर्ड केलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्या लॉगिन मध्ये आल्यानंतर प्रणालीमध्ये अपलोड करण्यात आलेल्या स्वयंसाक्षांकित कागदपत्रांपैकी, विद्यार्थ्यांची पात्रता, जातीचा दाखला, आवश्यकतेनुसार जात वैधता प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला व पात्र अभ्यासक्रम इत्यादी बाबींची कागदपत्रे संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी योजनेच्या निकषाच्या आधारे तपासून महाडीबीटी प्रणालीवरील अर्ज नियमानुसार मंजूर करावेत.

(५) व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीचे विहीत शैक्षणिक शुल्क व विकास निधी हे शुल्क नियामक प्राधिकरण (एफ.आर.ए.) व तत्सम प्राधिकरणाकडून निश्चित केले जाते. तसेच पारंपारीक अभ्यासक्रमांसाठीचे विहीत शैक्षणिक शुल्क, इतर शुल्क व परिक्षा शुल्क इ. हे संबंधित प्रशासकीय विभाग, विद्यापीठ, शैक्षणिक (कृषी, परिचारीका इ.) परिषदा या सक्षम प्राधिकरणाकडून निश्चित केले जाते. त्यानुसार महाडिबीटी प्रणालीवर सदरील शैक्षणिक शुल्क, विकास निधी, परिक्षा शुल्क व इतर शुल्क इ. ची रक्कम संबंधित सक्षम प्राधिकरणाने नोंदविलेले आहेत. सबब, महाडिबीटी प्रणालीवरील महाविद्यालयांच्या लॉगीन आयडीवर दर्शविण्यात आलेल्या शुल्क रचनेची खातरजमा करण्याची जबाबदारी ही **शुल्क नियामक प्राधिकरणाची राहील. तसेच सदरील शुल्क रचना त्या-त्या संबंधित सक्षम प्राधिकरणांमार्फत पुर्नपडताळणी करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.**

(६) सर्व संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी प्रणालीवर अर्ज मंजूर करताना शुल्क नियामक प्राधिकरण व इतर सक्षम प्राधिकरणाने निश्चित केलेले दर हे अंतिम समजून, त्यानुसार विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्याची कार्यवाही करावी. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाने प्रणालीवर मंजूर केलेल्या शुल्कानुसार लाभ देय राहील, याची नोंद घ्यावी. सदर शुल्काबाबत अपवादात्मक प्रसंगी काही संभ्रम निर्माण झाल्यास सदर बाब अर्ज मंजूर करण्यापूर्वी शुल्क नियामक प्राधिकरण/ त्या त्या संबंधित सक्षम प्राधिकरणास /महाविद्यालयाच्या निदर्शनास आणण्यात यावी. मात्र, या करीता अन्य अर्ज प्रलंबित ठेवू नयेत.

(७) सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता महाडिबीटी प्रणालीवर अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करताना संबंधित महाविद्यालयास देय होणारी "इतर फी" ची रक्कम ही पहिल्या सहामाहीऐवजी दुसऱ्या सहामाही मध्ये एकत्रीतरित्या मंजूर करण्यात येणार असून, तशी सुविधा प्रणालीवर निर्माण करण्यात आलेली आहे. त्यामुळे पहिल्या सहामाहीतील अर्ज "इतर फी" मुळे प्रलंबित न ठेवता ते नियमानुसार तातडीने निकाली काढावेत.



Kalambe Tarf Kale * Anandi Pharmacy College
Tal. Karveer, Dist. Kolhapur.

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email: anandipharmacycollege02@gmail.com



(८) अनुसुचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी सदर प्रणालीमध्ये नोंदविलेले अर्ज महाविद्यालया मार्फत सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्या लॉगिनमध्ये आल्यानंतर सदरील अर्ज सात दिवसापेक्षा जास्त दिवस मंजूरी अभावी प्रलंबित राहणार नाहीत, याची सर्व संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी दक्षता घ्यावी.

(९) सर्व संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी अनुसुचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यां करीता विहीत केलेल्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती व निर्वाह भत्ता योजनेअंतर्गत विहीत केलेल्या अटी, शर्ती, शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचना व वित्तीय नियमांचा कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

(१०) आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना अनुसुचित जाती प्रवर्गाच्या योजनांच्या अनुषंगाने महा-डिबीटी प्रणाली अंतर्गत तांत्रिकदृष्ट्या केंद्रीभूत "आहरण व संवितरण अधिकारी तथा समन्वय अधिकारी" म्हणून घोषित करण्यात आलेले असले तरी, अनुसूचित जातीच्या पात्र लाभार्थ्यांना अदा करण्यात येणाऱ्या लाभाच्या रक्कमेच्या वितरण कार्यपध्दती संदर्भातील बदल वगळता, उर्वरीत योजनांच्या प्रचलित शासन निर्णयान्वये निर्धारीत केलेली अंमलबजावणीची कार्यपध्दती कायम आहे, त्यामुळे महाडिबीटी प्रणालीवरील योजनांच्या अटी व शर्तीनुसार प्रत्यक्षातील अंमलबजावणी, प्राप्त होणाऱ्या अर्जाची पात्रतेची तपासणी, नियमानुसार मंजूरीबाबत **संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण हे अंतिमत: जबाबदार राहतील.**

(११) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण यांच्या अधिनस्त असणाऱ्या संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्यावर महाडिबीटी प्रणाली अंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील योजनानिहाय अर्ज मुदतीत मंजूर करण्याच्या दृष्टीने आवश्यक ते संनियंत्रण ठेवण्याची आणि वरिष्ठ कार्यालय तसेच क्षेत्रीय कार्यालये यांच्यात समन्वय ठेवण्याची जबाबदारी सर्व संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१९०१०८१७२३१७०४२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakant
haridas Wade

(चंद्रकांत ह. वडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई

२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई



Kalambe Tarf Kale ★ Anandi Pharmacy College
Tal. Karveer, Dist. Kolhapur.

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email: anandipharmacycollege02@gmail.com



३) अपर मुख्य सचिव (?) — अमुस, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
५) प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६) सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
७) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्र निकेतन, वांद्रा (पुर्व), मुंबई
११) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२) संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१५) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे
१६) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१९) सर्व सहायक आयुक्त, समाजकल्याण,
२०) निवड नस्ती

Anandi Pharmacy College, Kalambe Tarf Kale, Tal. Karveer, Dist. Kolhapur

Principal
Anandi Pharmacy College
Kalambe Tarf Kale,
Tal. Karveer, Dist. Kolhapur

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email: anandipharmacycollege02@gmail.com

विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील मुलामुलींना परदेशी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सन २०२१-२२ साठी विद्यार्थ्यांची निवड करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक : शिवृती २०२१/प्र.क्र.३५/शिक्षण-२,**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २९ नोव्हेंबर,२०२१

**संदर्भ:-**

१) शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग क्र.शिवृती-२०१८/प्र.क्र.११८/शिक्षण, दिनांक ११/१०/२०१८

२) शासन परीपत्रक,विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, क्र.शिवृती-२०१८/प्र.क्र.११८/शिक्षण, दिनांक १२/११/२०१८

**प्रस्तावना:-**

विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशातील नामांकित शिक्षण संस्थेत उच्च शिक्षणाची संधी मिळावी याकरीता सन २०१८-१९ पासून परदेशी शिष्यवृत्ती योजना संदर्भ क्र.१ येथे नमूद दिनांक ११ ऑक्टोबर,२०१८ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेली आहे.

२. महाराष्ट्रातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी आणि पीएचडी अभ्यासक्रमासाठी QS आणि THE यांच्या सरासरी २०० च्या आतील वर्ल्ड रँकींग असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमधील एकूण १० विद्यार्थ्यांची योजनेतर्गत निवड करण्यात येवून, त्यांना परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. त्यानुसार सन २०२१-२२ या वर्षाकरिता परदेशी शिष्यवृत्ती योजनेतर्गत विभागाकडे प्राप्त झालेल्या अर्जांच्या तपासणीअंती पात्र विद्यार्थ्यांची निवड करुन त्यांना परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय:-**

परदेशी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत संदर्भ क्र. १ येथे नमूद दिनांक ११ ऑक्टोबर,२०१८ च्या शासन निर्णयान्वये सचिव (इतर मागास बहुजन कल्याण) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या राज्य स्तरीय निवड समितीने निवड केलेल्या एकूण १० विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येत आहे. शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा तपशील सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये नमूद करण्यात आला आहे.

२. परदेशी शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांला अनुज्ञेय शिष्यवृत्ती प्रदान करण्यासाठी संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. परदेशी शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांकडून संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेली हमीपत्रे घेऊन तसेच विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची तपासणी करुनच संबंधित विद्यार्थ्यांस अनुज्ञेय शिष्यवृत्ती वितरीत करण्याची कार्यवाही संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांनी करावी.

३. ज्या विद्यार्थ्यांस शासनामार्फत परदेशी शिष्यवृत्ती मंजूर केली आहे, त्या विद्यार्थ्यांनी त्यांचे शिक्षण संपल्यानंतर देशाची सेवा करणे व त्यांच्या ज्ञानाचा फायदा देशाला करुन देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने संबंधित विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्ती मंजूर करण्यापूर्वी हमीपत्र (BOND) लिहून घेणे बंधनकारक राहील.

Kalambe Tarf Kale * Anandi Pharmacy College
Tal. Karveer, Dist. Kolhapur.

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email: anandipharmacycollege02@gmail.com



४. परदेशी शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांने परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पीएचडी अभ्यासक्रम विहित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यासाठी कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यास मुदतवाढ वा वाढीव खर्च दिला जाणार नाही.

५. परदेशी शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात आलेल्या संबंधित विद्यार्थ्यास उच्च शिक्षण घेण्यासाठी ज्या शैक्षणिक संस्था, विद्यापीठात अथवा अभ्यासक्रमास मान्यता दिलेली आहे, ते ठिकाण वा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांने परस्पर बदलल्यास संबंधित विद्यार्थ्याकडून शिष्यवृत्तीची रक्कम संपूर्णतः वसूल करण्यात येईल.

६. शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाच्या एकूण खर्चाच्या रकमेपैकी ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे, त्याला त्या वर्षाचे शुल्क, निर्वाह भत्ता व इतर अनुषंगिक खर्च यांची रक्कम संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांनी संबंधित विद्यापीठाकडून प्रमाणित माहिती प्राप्त करुन घेऊन, शिक्षण फी संबंधित विद्यापीठास आणि निर्वाह भत्ता व अनुषंगिक खर्चाची रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात अदा करावी.

७. याबाबत होणारा खर्च हा "मागणी क्रमांक झेडजी-०३, प्रधानशीर्ष २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण, ०३, मागासवर्गीयांचे कल्याण, २७७-शिक्षण, ०२ शिष्यवृत्ती विद्यावेतन, (०२)(१८) "विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" (२२२५ एफ २१८), " या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून त्या अंतर्गत चालू आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा. त्याकरीता संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

८. संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग यांनी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करताना संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक शिवृत्ती-२०१८ /प्र.क्र.११८ /शिक्षण, दिनांक ११ऑक्टोबर, २०१८ व शासन शुध्दीपत्रक क्रमांक शिवृत्ती २०१८ /प्र.क्र.११८ /शिक्षण, दिनांक १२ नोव्हेंबर, २०१८ मधील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करावे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२१११३०१२२०२९४१२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sangita Dinesh Shelke
Date: 2021.11.30 12:22:43 +05'30'

(संगिता शेळके)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री, इतर मागास बहुजन कल्याण मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
५. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव,मंत्रालय, मुंबई

Kalambe Tarf Kale ★ Anandi Pharmacy College
Tal. Karveer, Dist. Kolhapur

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email: anandipharmacycollege02@gmail.com



६. मा.प्रधान सचिव, महसूल व वन/वित्त / नियोजन /ग्रामविकास/ गृह निर्माण/ उद्योग,उर्जा व कामगार/ उच्च व तंत्रशिक्षण/ माहिती व तंत्रज्ञान/ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये/ कृषी व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई.

७. मा.सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक मंत्रालय,मुंबई

८. महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई (प्रसिध्दीसाठी)

९. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

१०. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण,मुंबई

११. सर्व प्रादेशिक उपायुक्त,समाजकल्याण विभाग.

१२. सर्व सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण विभाग.

१३. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद

१४. निवड नस्ती (शिक्षण)

Kalambe Tarf Kale ★ Anandi Pharmacy College
Tal. Karveer, Dist. Kolhapur.

**Principal**
Anandi Pharmacy College
Kalambe Tarf Kale,
Tal. Karveer, Dist. Kolhapur

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email: anandipharmacycollege02@gmail.com



(शासन निर्णय क्र इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्र.शिवृत्ती-२०२१/प्र.क्र.३५/शिक्षण, दिनांक २९ नोव्हेंबर,२०२१ चे सहपत्र)

प्रपत्र-अ

सन २०२१-२२ करीता विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती - निवड यादी

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | प्रवेश घेतलेल्या विद्यापीठाचे नाव | विद्यापीठाच्या देशाचे नाव | अभ्यासक्रम | परदेशातील विद्यापीठातील अभ्यासक्रमाचे नाव | अभ्यासक्रम कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ | ७ | ८ |
| १ | [illegible] | Georgia Institute of Technology Atlanta, United States | United state of America | अभियांत्रिकी | M.S. Industrial Engineering | २ वर्ष |
| २ | [illegible] | The University of Queensland, Brisbane | Australia | अभियांत्रिकी | Master of Engineering Sci. Management (P.G.) | २ वर्ष |
| ३ | [illegible] | The University of Edinburgh, Edinburgh U.K | United Kingdom | अभियांत्रिकी | M.S. Finance Technology and polytechnic | १ वर्ष |
| ४ | [illegible] | University of Glasgow, United Kingdom | United Kingdom | अभियांत्रिकी | M.Sc. in Data Science | १ वर्ष |
| ५ | [illegible] | University of Glasgow | Scotland | अभियांत्रिकी | MS. Robotics and Artificial Intelligence | २ वर्ष |
| ६ | [illegible] | Chalmers University of Technology, Gothenburg, Sweden | Sweden | अभियांत्रिकी | Master of Science in Mobility in Engineering Automobile | २ वर्ष |
| ७ | [illegible] | Durham University, Durham United Kingdom | United Kingdom | व्यवस्थापन | Master of Management International Business | १ वर्ष |
| ८ | [illegible] | Queen Mary University of London, London, United Kingdom | United Kingdom | व्यवस्थापन | M.Sc. IT Marketing | १ वर्ष |
| ९ | [illegible] | University of York, York, United Kingdom | United Kingdom | कला | M.A. Applied Human Right | १ वर्ष |
| १० | [illegible] | University of Amsterdam, Amsteram, Neterlands | Neterlands | कला (पीएचडी) | PhD Anthropology (A.I) | ५ वर्ष |

Digitally signed by Sangita Dinesh Shelke
Date: 2021.11.30 12:22:57 +05'30'

(संगिता शेळके)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Kalambe Tarf Kale ★ Anandi Pharmacy College
Tal. Karveer, Dist. Kolhapur.

पृष्ठ ४ पैकी ४

इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना या योजनेकरिता केंद्र शासनाकडून सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरिता प्राप्त निधी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : शिवृत्ती २०२१/प्र.क्र.१०४/शिक्षण**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- ०६ डिसेंबर, २०२१

**संदर्भ :-** केंद्र शासनाचे क्र. ११०१४/१३/२०२१ BC-I, दि. २६ ऑगस्ट, २०२१ चे पत्र.

**शासन निर्णय :-**

राज्यातील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र पुरस्कृत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतर्गत केंद्र शासनाने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता रु. १३,००,५०,०००/- इतका निधी त्यांच्या दि. २६/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये राज्यास वितरीत केला आहे. त्यानुसार, इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकारची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेतर्गत प्राप्त निधी रु. १३,००,५०,०००/- इतका निधी, मागणी क्र. झेड.जी ३, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०३ मागासवर्गीयांचे कल्याण, २७७, शिक्षण, (०२) शिष्यवृत्त्या/ विद्यावेतने, (०२) (१२) इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (केंद्र पुरस्कृत १०० टक्के) कार्यक्रम (२२२५ ई ९९१) या लेखाशिर्षाखाली खर्च करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदर योजनेकरिता संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे हे नियंत्रक अधिकारी राहतील. नियंत्रक अधिकारी यांनी उपरोक्त प्रमाणे वितरीत करण्यात आलेल्या तरतूदीच्या मर्यादेत विहित प्रयोजनातूनच खर्च करावा. सदर निधी खर्च झाल्यावर त्याबाबतचे खर्चाचे विवरण (जिल्हानिहाय खर्च/ लाभार्थी संख्या) व उपयोगिता प्रमाणपत्र न चुकता शासनास सादर करण्याची दक्षता, संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,पुणे यांची राहील.

०३. उपरोक्त योजनेतर्गत चालू आर्थिक वर्षातील खर्चाचे तसेच मागील वर्षातील खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे नियंत्रक अधिकारी यांनी तपासण्याच्या अधिन राहून निधी खर्च करण्याची जबाबदारी नियंत्रक अधिकाऱ्यांची राहील. तसेच वित्तीय नियमावली, महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका यानुसार वेळोवेळी वित्त विभागाने निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार सदर निधी खर्च करुन कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय,पुणे यांची राहील.

०४. नियंत्रक अधिकारी यांनी निधी खर्च करताना वित्त विभागाच्या दि. २६.०८.२०२१ च्या परिपत्रकामधील अटींची पुर्तता झाली असल्याची खातरजमा करुन निधी वितरीत करण्यात यावा.

Kalambe Tarf Kale * Anandi Pharmacy College
Tal. Karveer, Dist. Kolhapur

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit

**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**

Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email: anandipharmacycollege02@gmail.com



०५. सदर शासन निर्णय वित्त विभाग, अनौपचारीक संदर्भ क्र. १०३१/व्यय-१४, दि. ३/१२/२०२१ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

०६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२११२०७१७२८४५४०२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anand Arjun Mali

(आनंद माळी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
३) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखापरीक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई.
४) खाजगी सचिव, मा.मंत्री, मृदा व जलसंधारण, राजशिष्टाचार, इतर मागास बहुजन कल्याण यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२
५) संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे
६) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई-२
७) निवडनस्ती (शिक्षण).

Kalambe Tarf Kale ★ Anandi Pharmacy College
Tal. Karveer, Dist. Kolhapur.

**Principal**
Anandi Pharmacy College
Kalambe Tarf Kale,
Tal. Karveer, Dist. Kolhapur.

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email: anandipharmacycollege02@gmail.com

सन २०२२-२३ मध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेकरीता निधी वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: तंशिपू-३३२२/प्र.क्र.१६१/२२/तांशि-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:२५ मार्च, २०२३.

**वाचा:-**

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र अर्थसं-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३, दि.०४/०४/२०२२.
२) संचालक, तंत्रशिक्षण यांचे पत्र क्र.१८/ईबीसी/खप्रमा/२०२२-२३/६४, दि.१३/०४/२०२२.
३) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन ज्ञापन क्र.तंनिवि-१५२२/प्र.क्र.६८/२२/तांशि-३, दि.१०/०६/२०२२.
४) संचालक, तंत्रशिक्षण यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/शा.पत्र/२०२२/१५९, दि.२४/०६/२०२२.
५) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन ज्ञापन क्र.तंनिवि-१५२२/प्र.क्र.६८/२२/तांशि-३, दि.२६/०७/२०२२.
६) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शुध्दीपत्रक क्र.तंनिवि-१५२२/प्र.क्र.६८/२२/तांशि-३, दि.२६/०७/२०२२.
७) संचालक, तंत्रशिक्षण यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/शा.पत्र/२०२२/२२९, दि.३०/०८/२०२२.
८) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.तंनिवि-१५२२/प्र.क्र.६८/२२/तांशि-३, दि.०६/१०/२०२२.
९) संचालक, तंत्रशिक्षण यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/शा.पत्र/२०२२/३०३, दि.२४/११/२०२२.
१०) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पुरक-२०२२/प्र.क्र.९६/अर्थ-३, दि.२३/१२/२०२२.
११) शासन निर्णय क्रमांक: तंनिवि-१५२२/प्र.क्र.६८/२२/तांशि-३, दि.०९/०२/२०२३.
१२) संचालक, तंत्रशिक्षण यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/शा.पत्र/२०२३/६९, दि.०२/०३/२०२३.
१३) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२२/प्र.क्र.४३/अर्थ-३, दि.१६/०३/२०२३.

**प्रस्तावना:-**

सन २०२२-२३ मध्ये "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" या योजनेसाठी डिसेंबर, २०२२ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणीमागणीव्दारे अर्थसंकल्पित झालेल्या रु.४२५.०० कोटी व "१३, कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टांतर्गत मंजूर झालेल्या रु.३.५० कोटीपैकी रु.१.७८ कोटी असा एकूण रु.४२६.७८ कोटी इतका निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव संचालक, तंत्रशिक्षण यांनी संदर्भाधीन दि.०२/०३/२०२३ च्या पत्रान्वये सादर केला आहे. त्यास अनुसरुन निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" या योजनेतर्गत तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता प्रवेश घेतलेल्या व पात्र ठरलेल्या लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याकरीता "३४, शिष्यवृत्ती/विद्यावेतने" या उद्दिष्टासाठी चालू वर्षी सुधारित अंदाजामध्ये मंजूर झालेला रु.४२५,००,००,०००/- व "१३, कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टासाठी मंजूर झालेल्या रु.३,१५,००,०००/- पैकी पुनर्वितरणाव्दारे रु.१,४५,००,०००/- असा एकूण रु.४२६,४५,००,०००/- (अक्षरी रुपये चारशे सव्वीस कोटी पंचेचाळीस लक्ष फक्त) इतका निधी संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांना "खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून" आहरित व वितरीत करण्यास

Kalambe Tarf Kale ★ Anandi Pharmacy College
Tal. Karveer, Dist. Kolhapur.

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email : anandipharmacycollege02@gmail.com



मान्यता देण्यात येत आहे. तसेच आहरित व वितरीत करावयाच्या उद्दिष्टनिहाय निधीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | उद्दिष्टे | सुधारित अंदाजामध्ये मंजूर निधी | चालू वर्षी वितरीत केलेला निधी | वितरीत करावयाचा निधी |
|---|---|---|---|---|
| १ | ३४. शिष्यवृत्ती/विद्यावेतने | १२०७,९५,००,०००/- | ७८२,९५,००,०००/- | ४२६,४५,००,०००/- |
| २ | १३. कार्यालयीन खर्च | ३,१५,००,०००/- | १,७०,००,०००/- | ०.००/- |
| | एकूण | १२११,१०,००,०००/- | ७८४,६५,००,०००/- | ४२६,४५,००,०००/- |

अटी:-

१) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.टीईएम-२०१५/प्र.क्र.५०१/तांशि-४, दि.१३ ऑक्टोबर, २०१६, क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५५१/तांशि-४, दि.१५ एप्रिल, २०१७ व क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/ तांशि-४, दि.७ ऑक्टोबर, २०१७ तसेच या संदर्भातील इतर आदेशामध्ये नमूद अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.
२) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील पात्र प्रवेशित विद्यार्थ्यांनाच शैक्षणिक शुल्क शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात यावा. ही रक्कम पात्र विद्यार्थ्यांच्या महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून बँक खात्यात थेट जमा होईल या दृष्टिने कार्यवाही करावी. तथापि, न्यायालयीन निर्णयानुसार योग्य ती कार्यवाही करता येईल.
३) संचालक, तंत्रशिक्षण व सर्व विभागीय तंत्रशिक्षण सहसंचालकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील नमुन्यादाखल काही संस्थांना भेट देऊन या योजनेची अंमलबजावणी व्यवस्थितरीत्या होत असल्याची वेळोवेळी तपासणी करावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.
४) यापूर्वीच्या तपासणी अहवालात काही त्रुटी/अनियमितता आढळून आली असल्यास ती तात्काळ दूर करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना संचालक, तंत्रशिक्षण यांनी करावी. चुकीची अथवा खोटी माहिती भरुन शासनाकडून शिक्षण शुल्क प्राप्त करुन घेतले असल्याचे निदर्शनास आले असल्यास अशी रक्कम वसूल करुन ती शासनाकडे जमा करण्यात यावी. तसेच यामध्ये संस्था दोषी आढळल्यास सदर संस्थेच्या अभ्यासक्रमाची मान्यता काढून घेण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे अथवा अन्य सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करणे/फसवणूकीचा गुन्हा दाखल करणे या व अशा स्वरुपाची कडक कार्यवाही करण्यात यावी.
५) सदरहू निधी शिष्यवृत्तीसाठी तात्काळ वाटप करावा व उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे. निधीचे वाटप करण्यास विलंब करु नये. याबाबतची जबाबदारी संचालक, तंत्रशिक्षण यांची राहील.

३ सदर योजनेसाठी होणारा खर्च "मागणी क्र.डब्ल्यू-३, मुख्य लेखाशिर्ष २२०३-तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण १०७, शिष्यवृत्ती (००), (००)(०६) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, (कार्यक्रम) २२०३ ०७४८" या लेखाशिर्षाखाली दर्शविण्यात यावा व चालू आर्थिक वर्षात मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

४ सदर योजनेतर्गत शैक्षणिक वर्ष २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये पात्र ठरलेल्या ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम प्रलंबित आहे, अशा विद्यार्थ्यांची प्रलंबित रक्कम या आदेशान्वये वितरीत केलेल्या निधीतून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदरहू रु.४२६.४५ कोटी इतक्या रकमेतून प्रलंबित रक्कम वितरीत केल्यानंतर निधी शिल्लक राहिल्यास, तो शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीकरीता खर्च करण्यात यावा.

Kalambe Tarf Kale * Anandi Pharmacy College
Tal. Karveer, Dist. Kolhapur.

Anandi Shikshan Prasarak Mandal Sanchalit
**ANANDI B. PHARMACY COLLEGE,**
Kalambe Tarf Kale, Tal: Karveer, Dist: Kolhapur-416205 (M. S.) India
Approved by PCI New Delhi, Recognized by DTE, Mumbai, Govt. of Maharashtra,
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Email : anandipharmacycollege02@gmail.com



५. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०९/१४७१, दि.१३/०३/२०२३ अन्वये व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३१७/२०२३/व्यय-५, दि.१७/०३/२०२३ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन, त्याचा संकेतांक २०२३०३२५१२४००८०००८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANALI MILIND SAMANT

(मनाली सामंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सर्व विभागीय तंत्रशिक्षण सह संचालक, (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
४) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
५) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, बृहन्मुंबई.
७) नियोजन विभाग/वित्त विभाग, व्यय-५/अर्थसंकल्प-८, मंत्रालय, मुंबई.
८) कक्ष अधिकारी/तांशि-४, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) कक्ष अधिकारी/तांशि-१, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती/तांशि-३.

Kalambe Tarf Kale * Anandi Pharmacy College, Tal. Karveer, Dist. Kolhapur.

Principal
Anandi Pharmacy College
Kalambe Tarf Kale,
Tal. Karveer, Dist. Kolhapur.